राज्य माहिती आयोग, पुणे विभाग, पुणे

25

क्र.अपील/कोल्हापूर/१५४,६१,८०,१०८,१४६,/०७
राज्य माहिती आयुक्त कार्यालय, पुणे विभाग,
पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
फोन क्र. २६०५०५८०/२६०५०६३२/३३
दिनांक : २७/१२/२००७.

प्रति,

डॉ. जे.ए. कोरगावे,
रा १९१/१, आर.के.नगर,
मोरेवाडी, ता. करवीर,
जिल्हा कोल्हापूर.

विषय : माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जाबाबत.

महोदय,

आपण राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०.५.२००६, ५.६.२००६, ९.९.२००६, २.१२.२००६ , ११.१२.२००६ व दि.११.१२.२००६ रोजी दाखल केलेल्या व्दितीय अपीलाच्या अर्जाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, याच विषयाबाबत आपण यापूर्वी राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडे दाखल केलेले व्दितीय अपील मा. मुख्य राज्य माहिती आयुक्त यांनी दि.२१ फेब्रुवारी २००७ रोजीच्या आदेशानुसार फेटाळले आहे.

या कार्यालयाकडे वर दर्शविल्या दिनांकानुसार दाखल केलेल्या व्दितीय अपीलातील व राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडे दाखल केलेल्या व्दितीय अपीलातील विषय एकच असल्याने मा. मुख्य राज्य माहिती आयुक्त यांनी दि. ०७ फेब्रुवारी २००७ रोजी दिलेले आदेश विचारात घेवून आपली या कार्यालयाकडील वरील परिच्छेद एकमध्ये नमूद केलेल्या दिनांकाची अपिले मा. आयुक्त यांच्या निदेशानुसार निकाली काढण्यात येत आहेत.

२८/१२/०७

आपला,

कापु.

(य.ह.देशपांडे)
कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग,

# राज्य माहिती आयोग
# महाराष्ट्र

क्रमांक : अपिल-२००६/७४९/०२
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०२ मार्च, २००७.

प्रति,

१. डॉ.जे.ए.कोरेगावे,
   १९१/१, आर.के.नगर, मोरेवाडी,
   ता.करवीर, जिल्हा कोल्हापूर.

२. अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक,
   भूमि अभिलेख, सातारा.

३. जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी,
   शनिवार पोष्टाजवळ, कोल्हापूर.

**विषय : सुनावणीचे आदेश.**

महोदय,

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत डॉ.जे.ए.कोरेगावे यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपिलाच्या अनुषंगाने मा.मुख्य माहिती आयुक्त यांचे दालनात दि.२१ फेब्रुवारी, २००७ रोजी झालेल्या सुनावणीचे आदेश सोबत पाठविण्यात येत आहेत.

आपला,

(रा.म.गेंगजे)
कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग.

शिरस्तेदार
भूमापन अधिकारी

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक -२००७/७४४/०२

डॉ. जे. ए. कोरेगावे - अपीलार्थी
१३४/१, आर .के.नगर, मोरेवाडी.
ता.करवीर, जि.कोल्हापूर.

विरुध्द.

१. अधीक्षक -- उत्तरवादी.
भूमि अभिलेख, सातारा.
२, जनमाहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी
शनिवार पोष्टाजवळ, कोल्हापूर.

--विवेचन --

डॉ. जे.ओ. कोरेगावे ,मोरेवाडी, ता.करवीर. जि.कोल्हापूर यांनी आयोगाकडे दिनांक १७/४/२००६ रोजी हे द्वितीय अपील सादर केले आहे त्यासंदर्भात सुनावणी दिनांक २१ फेब्रुवारी २००७ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलकर्ते श्रीयुत. कोरेगावे, श्री.एस.व्ही.मुंदले, नगर भूमापन अधिकारी व श्री.एस.पी.शिंदे, अधीक्षक ,भूमि अभिलेख हे उपस्थित होते.

अर्जदारानी जी मुलतः नगर भूमापन अधिकारी यांचेकडे माहिती मागितली होती ती त्यांच्या कार्यालयाकडून जनतेकडे मिळकत पत्रिका व नोंद घेणे वगैरे कामासाठी पत्रव्यवहार वगैरेंचा खर्च म्हणून रु.१८/- रुपयांची पोष्टाची तिकीटे घेतली जातात त्यासंदर्भात होती. ही माहिती त्यांना दि. १७/२/२००६ रोजी देण्यांत आली. याने समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि. १६/३/२००६ रोजी प्रथम अपील केले. अपील अधिका-यांनी सुध्दा दिलेली सर्व माहिती ही बरोबर आहे असाच निर्वाळा देवून अपील निकाली काढले. सदरचे अपील हे या निर्णयाविरुध्द आहे.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे स्पष्ट झाले की, अर्जदारास माहिती देण्याबाबत कुठचाही कसूर झाला नाही. अर्जदारांची मुख्य तक्रार ही कायद्यात कुठेही तरतूद नसतांना किंवा वरिष्ठांकडून कुठचेही आदेश नसतांना केवळ बजेट तरतुद नाही असे कारण दाखवून जनतेकडून रु.१८/-

वी तिकीटे घेण्यात येतात, ती तिकीटे जरी वापरली जात असतील तरी त्याचा कुठचाही हिशोब ठेवला जात नाही या प्रवृत्तीविरुध्द आहे. अधिका-यांनी सांगितले की, ही पध्दत साधारणतः १ वर्षे चालू होती पण अर्जदारांच्या तक्रारीनंतर ती बंद करण्यांत आलेली आहे. या प्रवृत्तीविषयी व पध्दतीविषयी जर अर्जदार अजूनही असमाधानी असतील तर त्यांनी त्या विभागाच्या वरिष्ठांकडे तक्रार करणे हे जास्त श्रेयस्कर ठरेल. माहितीच्या अधिकारात फक्त योग्यती माहिती दिलेली आहे किंवा नाही हे बघितले जाईल, आणि त्यादृष्टीने विस्तृत माहिती ही दोन्ही अधिका-यांनी दिलेली आहे.

--आदेश--

अपील फेटाळून लावण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश कि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक- २१ फेब्रूवारी २००७

State Information Commission Maharashtra

क्रमांक माहिती अधिकार अपील क्रं.३४/२००६
अधीक्षक भूमि अभिलेख, कोल्हापूर
यांचे कार्यालय
कोल्हापूर दिनांक : ३०/११/२००६

| | | |
|---|---|---|
| डॉ.जे.ए.कोरेगांवे<br>१९१/१, आर.के.नगर,<br>मोरेवाडी, तालुका करवीर | } | अपीलदार |

विरूध्द

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी<br>नगर भूमापन अधिकारी, कोल्हापूर | } | जाबदार |

विषय : केंद्रीय माहिती अधिकारातंर्गत अपील अर्ज
संदर्भ : अपीलदार यांचा दिनांक २०/१०/२००६ चा अर्ज

महोदय,

उपरोक्त विषयांकित अपील अर्जाची सुनावणी पूर्ण इकडून दिनांक ३०/११/२००६ रोजी निर्णय दिलेला आहे. सोबत प्रत असे. सबब संदर्भीय अर्ज निकाली ठेवला आहे.

(मिलिंद चव्हाण)
प्रथम अपीलीय प्राधिकारी
अधीक्षक भूमि अभिलेख
कोल्हापूर

राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,

व्दारा :विभागीय आयुक्त कार्यालय,

विधान भवन, पुणे-४११ ००१

अपील क्रमांक -८८४ दिनांक २२/०३/२००७

प्रति,

श्री. ज्ञानेश्वर सीताराम कराळे

संस्थापक अध्यक्ष,

मानवाधिकार संघ,

मु.पो.देहूगांव, ता.हवेली. जि.पुणे अपीलकर्ता

विरुध्द

उपआयुक्त, सामान्य प्रशासन विभाग,

तथा माहिती अधिकारी, उत्तरदायी

अपील शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग,पुणे

## विवेचन

अपीलकर्ता श्री. ज्ञानेश्वर सीताराम कराळे यांनी दिनांक ०९/१२/२००५ रोजी जन माहिती अधिकारी तथा उपआयुक्त, सामान्य प्रशासन विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय,पुणे यांचेकडे अर्जाव्दारे कमाल जमीन धारणा, पुणे येथील उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्रमांक ३ श्री.संजय कुंडेटकर यांच्या विषयीच्या तक्रारी व त्या अनुषंगाने विभागीय आयुक्तांनी दिलेले चौकशीचे आदेश याबद्दल माहिती, अतिरिक्त आयुक्त श्री.रमेश देवकर यांनी श्री.कुंडेटकर यांच्या कारकीर्दीतील प्रकरणांची चौकशी करुन सादर केलेला अहवालाची प्रत व अन्य संबंधित कागदपत्रे मागितली होती. तसेच प्रकरणांची पुनर्तपासणी करण्याचे अधिकार श्री.देवकर यांना

आहेत काय ? अशी विचारणा करुन त्याबाबतचे शासकीय पत्र वा सूचना याची प्रमाणित प्रत मागितली होती. कमाल जमीन धारणा हा नगर विकास विभागाचा विषय असल्याने विभागीय आयुक्ताच्या कार्यकक्षेत कसा येतो, याबद्दलचा शासन आदेश व पुरावा याचीही मागणी श्री.कराळे यांनी अर्जात केली होती. जन माहिती अधिका-यांनी दिनांक ०२/०१/२००६ रोजी या अर्जाला उत्तर पाठविले. श्री. कुंडेटकर यांच्या प्रशासकीय कामकाजाच्या कार्यपध्दतीबद्दल गंभीर स्वरुपाच्या आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्यावरुन विभागीय आयुक्त यांनी चौकशी सुरु करण्याचा निर्णय घेतला. विभागीय आयुक्त हे अधिनस्त अधिका-यांच्या कार्यपध्दतीबाबत चौकशी करण्यास सक्षम आहेत. श्री.कुंडेटकर यांच्या संदर्भात फौजदारी गुन्हया अंतर्गत चौकशी सुरु असल्यामुळे तपास कामावर विपरीत परिणाम होऊ नये म्हणून चौकशी अहवालाची प्रत देता येणार नाही, असे जन माहिती अधिका-यांनी कळविले. याविरुध्द श्री.कराळे यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अपर आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेकडे दिनांक २३/०१/२००६ रोजी अपील केले. त्यावर अपर आयुक्तांनी दिनांक १५/२/२००६ रोजी सुनावणी घेतली. अपर आयुक्त यांनी त्यांच्या दिनांक २१/०२/२००६ च्या आदेशात 'गुन्हे अन्वेषण विभागामार्फत श्री.कुंडेटकर यांच्या विरोधात चालू असलेल्या चौकशीवर अपर आयुक्तांचा अहवाल अर्जदाराला दिल्याने परिमाण होईल काय ?, याबाबत गुन्हे अन्वेषण विभाग यांच्याकडून आवश्यक ती स्पष्टता करुन घ्यावी व त्याचा अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर अर्जदाराला उत्तर दयावे' असे अपर आयुक्तांनी जन माहिती अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन विभाग ) विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांना निर्देश दिले. याविरुध्द श्री.कराळे यांनी दि.०५/०४/२००६ रोजी राज्य माहिती आयुक्तांकडे अपील दाखल केले आहे. त्याची सुनावणी दिनांक २०/०२/२००७ रोजी ठेवण्यात आली होती. परंतु उभय बाजू उपस्थित नसल्यामुळे ती पुढे ढकलून दिनांक २२/०३/२००७ रोजी घेण्यात आली. यावेळी जन माहिती अधिकारी उपस्थित होते. प्रथम अपिलीय प्राधिकारी व अपीलकर्ता उपस्थित नव्हते. प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अपर आयुक्त यांनी दिनांक २१/०२/२००६ रोजी दिलेल्या आदेशानुसार दिनांक १७/०३/२००६ रोजी जन माहिती अधिका-यांनी गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, यांचेकडून अभिप्राय मागविला होता. या विभागाकडून दिनांक ०४/०४/२००६ रोजी प्राप्त झालेल्या अभिप्रायाची प्रत जनमाहिती अधिका-यांनी यावेळी सादर केली.

एकूण कागदपत्रे व जन माहिती अधिकारी तथा उपआयुक्त, सामान्य प्रशासन विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांनी मांडलेली भूमिका लक्षात घेता पुढील बाबी स्पष्ट होतात:

(१) श्री.कुंडेटकर, यांच्या संदर्भात गुन्हे अन्वेषण विभागामार्फत चौकशी चालू आहे. दिनांक ०९/१२/२००५ रोजी माहिती मागितली त्यावेळी श्री.कुंडेटकर यांचेवर फौजदारी गुन्हया अंतर्गत कोणतीही चौकशी सुरु नव्हती, असे अपीलकर्त्याने व्दितीय अपिलात म्हटले आहे. परंतु पोलीस उपअधिक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, भरारी पथक, पुणे यांनी दिनांक ०४/०४/२००६ रोजी उपायुक्तांना पाठविलेल्या अभिप्रायात श्री.कुंडेटकर यांना दिनांक ०३/०१/२००६ रोजी अटक करण्यात आली होती, असे नमूद केले आहे. अपीलकर्त्याने मूळ अर्ज केल्याच्या तारखेपासून तीन आठवडयात झालेली ही कारवाई आहे, हे लक्षात घेण्यासारखे आहे.

(२) श्री.कुंडेटकर,यांचे निवासस्थानी जप्त केलेल्या कागदपत्रातील १८५ आदेशांबाबतची छाननी अपेक्षित असून ती पूर्ण होईपर्यंत कोणतीही माहिती पुरविल्याने तपासात बाधा येण्याची शक्यता आहे, असे या अभिप्रायात नमूद केले आहे.

वरील पार्श्वभूमी लक्षात घेता मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे:

आदेश

(१) अपिल अशंत: मान्य करण्यात येत आहे.

(२) गुन्हे अन्वेषण विभागामार्फत चालू असलेली श्री.कुंडेटकर यांच्याबाबतची चौकशी पूर्ण झाली आहे किंवा कसे, याची माहिती घ्यावी. चौकशी पूर्ण झाल्यावर, अपर आयुक्तांनी केलेल्या चौकशीच्या अहवालाची प्रत अपीलकर्त्यास नियमानुसार योग्य ते शुल्क घेऊन द्यावी.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग पुणे

राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,

व्दारा :विभागीय आयुक्त कार्यालय,

विधान भवन, पुणे-४११ ००१

अपील क्रमांक -८८५

दिनांक २२/०३/२००७

प्रति,

मिन्हाजोद्दीन ताजोद्दीन काझी

न्यु धोंडीबा वस्ती,

शिवलाल पुढारी चाळच्या पाठीमागे,

रामवाडी, सोलापूर.

अपिलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा

अध्यक्ष, उर्दू मदत शाळा, खानापूर, पो.म्हैसलगी,

ता.अक्कलकोट, जि.सोलापूर,

उत्तरदायी

जनमाहिती अधिकारी तथा

मुख्याध्यापक, उर्दू मदत शाळा खानापूर,

पो.म्हैसलगी, ता.अक्कलकोट,

जि.सोलापूर

विवेचन

अपीलकर्ता मिन्हाजोद्दीन ताजोद्दीन काझी यांनी दिनांक ४/१०/२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रभारी मुख्याध्यापक, उर्दू मदत शाळा, खानापूर, यांचेकडे सन २००५-२००६ या शैक्षणिक

र्षामध्ये दाखल झालेले दाखले, विद्यार्थ्यांची हजेरी इ. ९ मुद्यांची माहिती मागितली होती. या अर्जाला जन माहिती अधिका-यांनी कोणतेही उत्तर दिले नाही. त्यामुळे श्री.काझी यांनी दिनांक ०४/०३/२००६ रोजी प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष, उर्दू मदत शाळा, खानापूर यांचेकडे अपील दाखल केले. संस्थेच्या अध्यक्षानी या अपिलाची कोणतीही सुनावणी केली नाही. तसेच, 'आपण केलेले अपिल विहित मुदतीत दाखल न केल्यामुळे फेटाळण्यात येत आहे', असे एकतर्फी उत्तर दिनांक ०१/०४/२००६ रोजी पाठविले. त्यांच्या या निर्णयाविरुध्द श्री.काझी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९/०४/२००६ रोजी अपील दाखल केले आहे. त्याची सुनावणी दिनांक २०.०२.२००७ रोजी ठेवली होती. त्यावेळी उत्तरदायीपैकी कोणीही उपस्थित राहिले नाही व अपीलकर्त्याने आपण येऊ शकत नसल्याचे कळविले होते. म्हणून दिनांक २२/०३/२००७ रोजी सुनावणी ठेवण्यात आली. त्यावेळी अपीलकर्ता उपस्थित राहिले होते. संस्थेच्या वतीने कोणीही उपस्थित राहिले नाही. तसेच काहीही कळविले नाही.

एकूण कागदपत्रे पाहता पुढील बाबी स्पष्ट होतातः

(१) श्री. मिन्हाजोद्दीन ताजोद्दीन काझी यांनी दिनांक १३/०४/२००६, १७/०७/२००६ व ०५/०२/२००७ या तारखेस मागणी करुनही कोणतीही माहिती त्यांना दिली गेली नाही.

(२) श्री.काझी वरील संस्थेत शिक्षक म्हणून सेवेत होते. संस्थेने त्यांना कमी केले असून त्या विरुध्द ते न्यायालयात गेले आहेत. ते न्यायालयात जाण्यापर्यंतच्या कालावधीचे वेतन त्यांना अदा करावे, असे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हापरिषद, सोलापूर यांनी संस्थेला यापूर्वी दिनांक ३०/०९/२००५ व ०४/१०/२००५ रोजी कळविले आहे. तसेच, शिक्षणाधिकारी यांनी प्रभारी मुख्याध्यापकांना पाठविलेल्या आदेशामध्ये 'श्री.मि.ता.काझी यांना तात्काळ हजर करुन घेऊन त्यांचा मार्च २००५ पासून श्री.काझी न्यायालयात जाईपर्यंतचा पगार त्वरित काढण्यात यावा, अन्यथा आपले वेतन थांबविणेत येईल असे कळविणेत आले असल्याने श्री.काझी यांचे बाबतीत तात्काळ कार्यवाही करणे आपणांस बंधनकारक आहे', असे म्हटले आहे. श्री.काझी,

यांनी प्रत्यक्ष सांगितल्याप्रमाणे व अर्जात नमूद केल्याप्रमाणे संस्थेकडून हे वेतन मिळालेले नाही.

वरील पार्श्वभूमी लक्षात घेता मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील मान्य करण्यात येत आहे.

प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपील फेटाळण्याचे दिलेले कारण चुकीचे आहे जन माहिती अधिका-यांनी माहितीच दिलेली नसल्यामुळे नियमाप्रमाणे ३० दिवस प्रतीक्षा करुन प्रथम अपील दाखल केलेले आहे.

दिनांक ०३/०३/२००६ रोजी प्रथम अपील केले. त्यानंतर आज दिनांक २२/०३/२००७ पर्यंत म्हणजेच वर्ष उलटून गेल्यानंतरही अपील कर्त्याला कोणतीही माहिती मिळालेली नाही. त्यामुळे जन माहिती अधिका-यांना रु.२५,०००/- शास्ती लावण्यात येत आहे. संस्थेच्या अध्यक्षानी ही शास्ती माहे एप्रिल २००७ पासून चार महिन्यांच्या त्यांच्या वेतनातून समान हप्त्यात वसूल करण्यात यावी. आयोगाला तसा पूर्तता अहवाल पाठवावा.

श्री.काझी यांना हवी असलेली कागदपत्रे कोणतेही शुल्क न आकारता दिनांक १५ एप्रिल २००७ पर्यंत द्यावीत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग पुणे

राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयुक्त, कार्यालय,
द्वारा : विभागीय आयुक्त कार्यालय,
विधान भवन, पुणे- ४११००१.

क्रमांक - अपील-२००७/८८८/०२

प्रति,
श्री. विलास जगन्नाथ साठे
मु. चिखलगोठण, पो. निमळक,
ता. तासगाव, जि. सांगली. .. अपीलकर्ता..

विरुध्द

अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी
पंचायत समिती तासगाव, जि. सांगली.

.. उत्तरवादी ..

जनमाहिती अधिकारी, तथा ग्रामसेवक,
चिखलगोठण ता. तासगांव जि.सांगली

## विवेचन

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, तासगाव यांनी दिलेल्या निर्णयाविरुध्द अपिलार्थी यांनी 'माहितीचा अधिकार अधिनियम २००५' च्या कलम १९(३) अन्वये दि.१५ एप्रिल २००६ या तारखेस दाखल केलेले अपील दि. १८ एप्रिल २००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे आले आहे. त्याची सुनावणी दि. २० फेब्रुवारी २००७ रोजी पुणे येथे घेण्यात आली.

मिळालेली नाहीत. असे अपीलकर्त्यांचे म्हणणे आहे. अपिलीय प्राधिका-यांनी दिलेल्या निर्णयातही या पत्रांचा उल्लेख नाही. आपल्याकडे दोन गावांचे काम आहे, कामाचा ताण असल्यामुळे उत्तर पाठविता आले नाही, असेही जनमाहिती अधिकारी-ग्रामसेवकांनी सांगितले व अपिलीय प्राधिकारी गटविकास अधिका-यांनी त्याला पुष्टी दिली. दि. २ जुलै २००५ व दि. १८ ऑगस्ट २००५ या दोन दिवसांच्या ग्रामसभांच्या इतिवृतांची प्रत अर्जदाराने मागितली होती. तेवढेच रजिस्टर गहाळ झाले आहे, हे आश्चर्य वाटावे असे आहे. रजिस्टर गहाळ झाल्याची वर्दीही अर्जदाराच्या दि. २६ जानेवारी २००६ च्या अर्जाला उत्तर देण्याची मुदत पूर्ण होत असताना - दि. २४ फेब्रुवारी २००६ रोजी (म्हणजे सभांच्या तारखांपासून सुमारे सहा महिन्यांनी) पोलीस ठाण्यात दिली आहे.

'विविध कार्यालयांकडील नोंदीवरुन आता अर्जदाराला हवी असलेली माहिती देता येईल', असे जनमाहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सुनावणीदरम्यान सांगितले. ती तयार होती तर यापूर्वीच का दिली नाही, याचे समाधानकारक उत्तर ते देऊ शकले नाहीत.

जनमाहिती अधिकारी-ग्रामसेवकांनी तीस दिवसांत - दि. २५ फेब्रुवारी २००६ पर्यंत माहिती देणे अगर नाकारणे अथवा उपलब्ध नसल्याचे कळविणे आवश्यक होते. परंतु यातील काहीही त्यांनी केलेले नाही,म्हणजे माहिती नाकारली आहे. माहितीचा अधिकार अधिनियमाचे पालन केलेले नाही.

अपिलीय प्राधिकारी असलेले गटविकास अधिकारी श्री. माणिक नानदेव दिव यांनी ग्रामसेवकाच्या या कायदेभंगाची गंभीर दखल घेणे आवश्यक होते. त्यांनी ती घेतली नाही. एवढेच नव्हे, तर माहिती-मागणीच्या अर्जाची दखल न घेण्याच्या ग्रामसेवकाच्या कृत्याचे समर्थन करण्याची भूमिका घेतली. याबाबत तीव्र नापसंती मी नोंदवीत आहे व त्याची त्यांना जाणीव देण्यात येत आहे.

सर्वसामान्य माणसाला माहिती मिळण्यात होणा-या अडवणुकीचे हे नमुनेदार उदाहरण आहे. अशा अडवणुकीच्या व पर्यायाने माहिती नाकारुन हक्क डावलण्याच्या प्रवृत्तीला आळा घालणे आवश्यक आहे. म्हणून, एकूण कागदपत्रे व उभय बाजूंची निवेदने लक्षात घेऊन मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

नियोजित वेळी जनमाहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. त्यांची बाजू ऐकून घेतली. अपीलकर्ता सुमारे तीन तास उशिरा आले. 'आपण खेडेगावातून येत असल्यामुळे एस.टी. मिळून पोहोचण्यास विलंब झाला,' असे कारण त्यांनी सांगितले. त्यांचे म्हणणे त्यांनी मांडले. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकल्यानंतर पुढील बाबी स्पष्ट होतात :

१. अपीलकर्त्याने (अ) दि. २ जुलै २००५ रोजी झालेल्या महिला ग्रामसभेच्या ठरावाची व प्रोसीडिंगची सहया असलेली नक्कल व (ब) दि. १५ ऑगस्ट २००५ रोजी झालेल्या ग्रामसभेच्या ठरावाची व प्रोसीडिंगची सहया असलेली नक्कल अशी माहिती मागितली होती.

२. माहिती मागणारा अर्ज दि. २६ जानेवारी २००६ रोजी अपीलकर्त्याने केला व जनमाहिती अधिका-यांना त्याच दिवशी तो मिळाला आहे. या अर्जाचे उत्तर जनमाहिती अधिकारी-ग्रामसेवक यांनी तीस दिवसात, म्हणजे दि.२५ फेब्रुवारी २००६ पर्यंत देणे आवश्यक होते. परंतु त्यांनी कोणतेही उत्तर दिले नाही. त्यामुळे अपीलकर्त्याने दि. १ मार्च २००६ रोजी अपिलीय प्राधिकारी-गटविकास अधिकारी, पंचायत समिती, तासगाव यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिका-यांनी दि. १३ मार्च २००६ रोजी अपीलकर्त्याला उत्तर पाठविले. 'ग्रामपंचायत चिखलगोठणचे महिला ग्रामसभेचे प्रोसीडिंगचे रजिस्टर गहाळ झालेले असून, त्याबाबत ग्रामपंचायतीने तासगाव पोलीस ठाण्याकडे तक्रार नोंदविली आहे. त्यामुळे ग्रामसेवकाने माहिती देण्यामध्ये टाळाटाळ केल्याचे दिसून येत नाही', असे या पत्रात कळवून अपिलीय प्राधिका-यांनी अपील निकालात काढले आहे. तसेच 'प्रोसीडिंग प्राप्त होताच अर्जदारास आवश्यक ती कागदपत्रे देण्याची व्यवस्था करावी,' असा आदेश ग्रामसेवकास दिला आहे.

३. या निर्णयाविरुध्द अपीलकर्त्याने दि. १५ एप्रिल २००६ रोजी अपील दाखल केले आहे.

- ग्रामसेवकांनी मूळ अर्जाची दखलच घेतलेली नाही, हे गंभीर आहे. 'अर्जदार व्यक्तिशः माहिती नेणार होता, त्याला दोन पत्रे पाठविली, परंतु तो आला नाही,' असे त्यांनी सांगितले व दोन पत्रांच्या अंडर सर्टिफिकेटने पाठविल्याच्या कार्बन प्रती त्यांनी दाखविल्या. अशी पत्रे आपल्याला

# आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. अर्जदाराला उत्तर न देणे व विलंब याबाबतचे जनमाहिती अधिकारी-ग्रामसेवकांचे म्हणणे समर्थनीय नाही, समाधानकारक नाही. मूळ अर्जापासून अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय देईपर्यंतचा कालावधी –दि. २५ फेब्रुवारी २००६ ते दि. १३ मार्च २००६ म्हणजे १६ दिवस विलंब धरून रु. ४०००/- शास्ती लावण्यात येत आहे.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, सांगली यांनी सदरची रक्कम श्री. रामराव कृष्णा शिंदे, ग्रामसेवक, निमळक, मु. चिखलगोठण यांच्या माहे मार्च २००७ व एप्रिल २००७ या दोन महिन्यांच्या पगारातून दोन हप्त्यात वसूल करावी व शासन निर्णयानुसार विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करून तसा पूर्तता अहवाल राज्य माहिती आयोगाला त्वरित सादर करावा.

४. ग्रामसेवक श्री. रामराव कृष्णा शिंदे यांना समज देण्यात येत आहे.

५. 'आता माहिती देणे शक्य आहे', असे ग्रामसेवक व गटविकास अधिकारी यांनी सुनावणीत नमूद केले आहे. त्यामुळे सुनावणीच्या दिवसापासून पाच दिवसात संबंधित माहिती अपीलकर्त्याला विनाशुल्क द्यावी व ती दिल्याची पोंच राज्य माहिती आयोगाकडे त्वरित पाठवावी. (ही माहिती दुस-याच दिवशी-चोवीस तासांच्या आत अपीलकर्त्याला पोहोचविल्याचे व तसा अहवाल आयोगाकडे पाठवीत असल्याचे गटविकास अधिकारी श्री. माणिक नामदेव शिंदे यांनी दि. [illegible] फेब्रुवारी २००६ रोजी दूरध्वनीवरुन कळविले.)

दि. २ मार्च २००७

विजय वि. कुवळेकर
राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे

प्रत :

१. श्री. विलास जगन्नाथ साठे, मु. चिखलगोठण, पो. निमळक,
ता. तासगाव, जि. सांगली.

२. प्रथम अपील प्राधिकारी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, तासगाव, जि. सांगली.

३. सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई.

४. कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, सांगली. पुढील कार्यवाहीकरिता

राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,

व्दारा :विभागीय आयुक्त कार्यालय,

विधान भवन, पुणे-४११ ००१

अपील क्रमांक -८९४ दिनांक २३/०३/२००७

प्रति,

श्री. शरदराव दिनकर गवळी

उंडवडी-सुपे-बारामती, पुणे अपिलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा

प्रतिरुप मुद्रण तंत्रज्ञ

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे

उत्तरदायी

जनमाहिती अधिकारी तथा

मानव व नियोजन पर्यवेक्षक,

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे-१

विवेचन

अपिलकर्ता श्री.शरदराव दिनकर गवळी यांनी दिनांक ०९/०१/२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा शासकीय ग्रंथागार, फोटोझिंको प्रेस, पुणे यांचेकडे अर्ज करुन उपलब्ध मराठी पुस्तकांची सूची व १९९५ पासूनची ग्रामपंचायत, महसूल व बांधकाम विभाग या संदर्भातील शासन निर्णयाची परिपत्रके याची मागणी केली. जन माहिती अधिका-यांनी या अर्जाला दिनांक २१/०१/२००६ रोजी उत्तर दिले. उपलब्ध पुस्तकांची यादी तयार करण्याचे काम सुरु आहे. शासन

निर्णय, परिपत्रके या ग्रंथागारात विक्रीस उपलब्ध नसतात, असे उत्तराव्दारे कळविण्यात आले त्याविरुध्द श्री.गवळी यांनी दिनांक १७/०२/२००६ रोजी अपिलीय प्राधिका-यांकडे अपील केले माहिती देण्यास टाळाटाळ व कसूर केली. त्यामुळे संबंधित अधिका-यावर दंडात्मक कारवाई करण्याची मागणी त्यांनी या अपिलाव्दारे केली. प्रथम अपिलीय प्राधिका-यांना दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार नाहीत, याची कल्पना अर्जदाराला दिसत नाही. अपिलीय प्राधिका-यांनी दि. २०/०२/२००६ रोजी जन माहिती अधिका-यांच्या उत्तराची प्रत माहिती म्हणून अपीलकर्त्याला पुन्हा पाठविली. त्याविरुध्द अपीलकर्त्याने दिनांक १७/०४/२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे. दिनांक २३/०२/२००७ रोजी त्याची सुनावणी घेतली. त्यावेळी अपीलकर्ता उपस्थित नव्हते. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. दिनांक २२/०३/२००७ रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी ठरलेल्या वेळी श्री.गवळी उपस्थित नव्हते. नंतर ब-याच उशिराने ते आले व त्यांनी आपले निवेदन सादर केले.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी हे फोटोझिंको मुद्रणालयातील तांत्रिक कर्मचारी असून ते चार -चार पदांचा अतिरिक्त कार्यभार सांभाळीत आहेत, असे उपस्थित कर्मचा-यांनी त्यावेळी निदर्शनास आणून दिले. उपलब्ध प्रकाशनांची सूची तयार असल्याचे व आता ती पाठविता येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. माहिती देण्यास टाळाटाळ व विलंब केल्यामुळे त्यांना शास्ती लावावी, अशी मागणी श्री.गवळी यानी लेखी निवेदनात व सुनावणी दरम्यान केली. उभय बाजूंची मागणी, विषयाची मर्यादित व्याप्ती लक्षात घेता मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे:

आदेश

(१) अपिल निकाली काढण्यात येत आहे.

(२) फोटोझिंको मुद्रणालयातील कर्मचारी तंत्रज्ञ असून त्यांच्यावरील कामाचा ताण लक्षात घेता माहिती देण्यात टाळाटाळ करण्याचा त्यांचा हेतू नाही, याबद्दल खात्री पटली आहे. त्यामुळे शास्ती लावण्यात येत नाही.

(३) मुद्दा क्रमांक १ मधील यादी कोणतेही शुल्क न आकारता अपिलकर्त्याला दोन दिवसात पाठवावी, असा आदेश दिनांक २३/२/२००७ च्या सुनावणीच्या वेळी दिला

होता. त्याचा पूर्तता अहवाल दरम्यानच्या काळात सादर करण्यात आलेला आहे तो स्वीकारण्यात येत आहे.

(४) मुद्दा क्रमांक २ मधील माहिती आपल्या विभागाकडे उपलब्ध नाही, एवढेच कळवून न थांबता संबंधित कार्यालयाकडे ही मागणी जन माहिती अधिका-यांनी पाठविणे आवश्यक होते. ते त्वरित करावे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग पुणे.

राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
व्दारा :विभागीय आयुक्त कार्यालय,
विधान भवन, पुणे-४११ ००१

अपील क्रमांक -८९७ दिनांक २२/०३/२००७

प्रति,

श्री. रामचंद्र गोविंद पाटील
कुमठे तासगांव, जि.सांगली अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष
अधीक्षक अभियंता, लघु पाटबंधारे (स्था.स्तर )
मंडळ येरवडा, पुणे

उत्तरदायी

जनमाहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्था.स्तर )
कृष्णानगर, सातारा, जि. सातारा,

विवेचन

श्री. रामचंद्र गोविंद पाटील यांनी दिनांक २३.१२.२००५ रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर ) कृष्णानगर, सातारा यांचेकडे केलेल्या अर्जाव्दारे त्यांच्या सेवेच्या काळातील पक्षघाताच्या खास रजेच्या संदर्भात विविध प्रकारची माहिती मागितली होती. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ अन्वये हा अर्ज केला असला तरी

तो माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत समाविष्ट करण्यात आलेला आहे. कार्यकारी अभियंता, यांनी दिनांक ०३/०१/२००६ रोजी त्या संदर्भात सविस्तर उत्तर पाठविले. त्याविरुध्द श्री.पाटील यांनी दिनांक २५/०१/२००६ रोजी प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, येरवडा, पुणे यांचेकडे अपील केले. त्यांनी दिनांक ०३/०३/२००६ रोजी त्याबाबतचा निर्णय दिला. 'पक्षघाताच्या रजा मंजुरी प्रकरणात देय पगाराची रक्कम वेळेवर न मिळता दिरंगाईने मिळाल्याने व्याज व नुकसान भरपाई दयावी', अशी मागणी श्री.पाटील यांनी मुळ अर्जात व त्याच्या अनुषंगाने अपिलातही मांडलेली आहे. अपिलीय प्राधिकारी यांनी जन माहिती अधिका-यांचा निर्णय योग्य ठरवून अपील अमान्य केले. याविरुध्द श्री.रामचंद्र पाटील यांनी दिनांक १३/०४/२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे. त्याची सुनावणी दिनांक २३/२/२००७ रोजी ठेवली होती परंतु श्री.पाटील हे उपस्थित नव्हते. संबंधित अधिकारी उपस्थित होते. त्यामुळे पुन्हा दिनांक २२/३/२००७ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. त्याही वेळी अधिकारी उपस्थित होते, श्री.पाटील उपस्थित नव्हते.

अधिका-यांनी मांडलेली बाजू व श्री.पाटील यांनी सादर केलेली विस्तृत कागदपत्रे याचा विचार करता पुढील बाबी स्पष्ट होतात:

(१) श्री.पाटील यांचा मूळ प्रश्न १५/०२/१९९३ ते २६/१०/१९९३ अखेरची देय रक्कम व त्यावरील व्याज मिळणेबाबतची आहे. त्या अनुषंगाने ते सर्व पत्रव्यवहार करीत आहेत.

(२) त्यांनी माहितीच्या अधिकारात केलेल्या अर्जात '. . . याला जबाबदार कोण ?' 'पत्रव्यवहार केला काय?' 'प्रलंबित देयके कोषागार प्रशासकीय विभागाच्या मंजूरीशिवाय प्रदान करीत नाही याची माहिती आपल्याला आहे काय ?', 'कोणताही पाठपुरावा केलेला नाही याची कारणे काय ? ' हे व अशा स्वरुपाचे प्रश्न विचारले आहेत. माहितीच्या अधिकाराच्या कायद्यात अशा स्वरुपाचे खुलासे मागणे बसत नाही.

(३) त्यांची मूळ मागणी ही बाब पूर्णत: प्रशासनांतर्गत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये हा विषय समाविष्ट होत नाही.

## आदेश

अपील नाकारण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग पुणे

राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,

व्दारा :विभागीय आयुक्त कार्यालय,

विधान भवन, पुणे-४११ ००१

अपील क्रमांक -९५४ दिनांक १६/०३/२००७

प्रति,

श्री. कृष्णा विश्वनाथ जंगम

मु.पो.ता.वाळवा, जि.सांगली अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा

आयुक्त, ,

सांगली ,मिरज,कुपवाड शहर महानगरपालिका

उत्तरदायी

जनमाहिती अधिकारी तथा

सहाय्यक आयुक्त,

सांगली ,मिरज,कुपवाड शहर महानगरपालिका

विवेचन

अपीलकर्ता श्री. कृष्णा विश्वनाथ जंगम यांनी दिनांक १५/०४/२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, सांगली ,मिरज,कुपवाड शहर महानगरपालिका यांचेंकडे पुढीलप्रमाणे माहिती मागितली :

(१) वर्ग-४ कर्मचारी नवीन भरती किती केले ?

(२) जुने बदली कामगार कायम किती केले ?

(३) जे बदली कामगार कायम केले त्यांना कोणत्या कायद्याच्या आधारे कायम केले त्या कायद्याची छायांकित प्रत

(४) जे बदली कामगार कायम केले त्यांची प्रथम बदली नियुक्तीची तारीख प्रत्येक कामगाराप्रमाणे

(५) वर्ग ४ कर्मचारी यांची सेवाज्येष्ठता यादीची छायांकित प्रत

(६) वर्ग ४ चे कर्मचारी किती याची यादी

सहाय्यक जन माहिती अधिका-यांनी दिनांक ०६/०५/२००६ रोजी या अर्जाला उत्तर पाठविले. त्यात मुद्दा क्रमांक २,३,४ व ५ यांची माहिती दिली. मुद्दा क्रमांक १ मध्ये संपूर्ण कर्मचा-यांबाबतची माहिती न देता अनुशेष भरती अंतर्गत कामगारांची माहिती दिली. मुद्दा क्रमांक ६ ची माहिती दिल्याचे पत्रात म्हटले असले तरी प्रत्यक्षात माहिती दिलेली नाही. याविरुध्द श्री.जंगम यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त यांचेकडे दिनांक २०/०६/२००६ रोजी अपील केले. या अपिलाची सुनावणी करुन तत्कालीन प्रभारी आयुक्त यांनी दिनांक ०८/०८/२००६ रोजी निर्णय कळविला. सहाय्यक जन माहिती अधिका-यांनी दिलेली माहिती योग्य व बरोबर असल्याचा निष्कर्ष त्यांनी काढला. अपीलकर्त्याला सुनावणीस तीन वेळा संधी देऊनही ते उपस्थित राहिलेले नाहीत, असे त्यांनी आपल्या आदेशात नमूद केले आहे. तसेच, मूळ अर्जातील माहिती व्यतिरिक्त अन्य माहितीही अपिलात मागितल्याचे त्यांनी म्हटले आहे. या निर्णयाविरुध्द श्री.जंगम यांनी दिनांक ११/०९/२००६ रोजी राज्य माहिती आयुक्तांकडे अपील केले आहे. त्याची सुनावणी दिनांक १६/०३/२००७ रोजी घेण्यात आली. यामुळे अपीलकर्ता उपस्थित नव्हते. परंतु त्यांनी त्यांचे लेखी निवेदन पाठविले. त्यावेळी सहाय्यक माहिती अधिकारी श्री.जे.व्ही.नाईक हे उपस्थित होते. उभय बाजूंचे म्हणणे व कागदपत्रे विचारात घेता पुढील बाबी स्पष्ट होतात:

(१) श्री.जंगम यांनी मागितलेली अत्यंत साधी माहिती देण्यात जन माहिती अधिका-यांनी कुचराई केली व फाटे फोडण्याचा प्रयत्न केलेला आहे. अपिलीय प्राधिकारी तथा प्रभारी आयुक्त यांनी त्यांना पाठीशी घालण्याची भूमिका घेतलेली आहे. वस्तुत: द्यावयाच्या राहिलेल्या दोन मुद्यांच्या संदर्भातील माहिती त्वरित देणे त्यांना सहज शक्य होते.

(२) 'सुनावणीची तीन वेळा संधी देऊनही अर्जदार हजर राहिले नाहीत', असे प्रभारी आयुक्तांच्या आदेशात म्हटले आहे. याच आदेशात प्रत्यक्षात यातील एका तारखेला ते स्वत: परगावी गेल्याचे नमूद केलेले आहे. इतर दोन तारखेच्या सुनावणीची पत्रे आपल्याला सुनावणी नंतर मिळाली, असे श्री.जंगम यांचे म्हणणे आहे. त्याला पुष्टी देण्यासाठी त्यांनी काही कागदपत्रे सादर केली आहेत. मात्र या कागदपत्रांवरुन सुनावणीबाबत जाणीवपूर्वक उशिरा पत्रव्यवहार केल्याचे सिध्द होत नाही.

(३) मूळ अर्जात मागितलेल्या माहितीच्या व्यतिरिक्त अधिक माहिती अपिलात मागितलेली आहे, हे अपिलीय प्राधिका-यांच्या आदेशातील म्हणणे रास्त नाही. मूळ अर्जात मागिलेल्या माहितीचा नेमकेपणा अपिलात पुन्हा मांडलेला आहे.

(४) अर्जात पूर्ण पत्ता दिलेला नाही, टेलिफोन नंबर दिलेला नाही, असे प्रशासकीय अधिका-यांनी त्यांना दिनांक ११/०९/२००६ रोजी पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे. माहितीची मागणी करणा-या अर्जाबाबत महानगरपालिकेच्या अधिका-यांची भूमिका कशी आहे हे वर नमूद केल्याप्रमाणे व या पत्रातील उल्लेखावरुन दिसून येते. एकीकडे 'अपिलामध्ये आपण आपला पूर्ण पत्ता दिलेला नाही, संपर्क साधण्यासाठी टेलिफोन नंबर दिलेला नाही', असे प्रशासकीय अधिकारी लिहीत आहेत, त्याच वेळी मायन्यामध्ये 'मु.पो.ता.वाळवा, जि.सांगली' असा अर्जदाराचा पत्ता दिलेला आहे. याच पत्त्यावर महानगरपालिकेच्या अधिका-यांनी पाठविलेली व राज्य माहिती आयोगाने पाठविलेली पत्रे अर्जदाराला मिळालेली आहेत, हे लक्षात घेण्यासारखे आहे. महानगरपालिकेच्या वतीने अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त यांनी माहिती आयोगाला सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अर्जदार वारंवार वेगवेगळया माध्यमातून महानगरपालिकेशी पत्रव्यवहार करुन महानगरपालिकेतील कर्मचारी/अधिकारी यांचा कामकाजाचा वेळ व श्रम विनाकारण वाया घालवतात.

सार्वजनिक प्राधिकरणातील अधिका-यांनी माहिती देण्याची सकारात्मक भूमिका ठेवली

आणि तांत्रिकतेवर भर देत टोलवाटोलवी केली नाही तर कर्मचारी व अधिकारी यांच्याप्रमाणेच सर्व-सामान्य माणसांचा आणि माहिती आयोगाच्या यंत्रणेचा वेळ व श्रम निश्चित वाचू शकतील.

## आदेश

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्याला द्यावयाची असलेली माहिती कोणतेही शुल्क न आकारता चार दिवसात द्यावी. त्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगाकडे पाठवावा.

(३) माहितीचा अधिकार अधिनियमातील मुदतीविषयीचे बंधन अधिका-यांनी तांत्रिकदृष्टया पाळले आहे. त्यामुळे शास्ती लावण्यात आलेली नाही. परंतु विषयाच्या हाताळणीबाबत मात्र तीव्र नापसंती नोंदविण्यात येत आहे. संबंधितांना त्याबद्दल समज देण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग पुणे.